INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 5 | JUNE – 2021

# ज्ञानाधिष्ठित समाजातील शिक्षण पद्धती

प्रा. सुकेशिनी अंकुश जानराव
सोलापूर

## प्रस्तावना :-



गेल्या काही शतकांत जगामध्ये अनेक प्रकारची सामाजिक परिवर्तने झाली. या परिवर्तनाचे विशेष म्हणजे याची जगाच्या दृष्टीने असणारी सार्वत्रिकता व गती. अगदी कृषिप्रधान समाजापासून विज्ञानाधिष्ठित समाज अशी या परिवर्तनाची गती तर पुढेपुढे अधिकच होत जाऊन माहिती तंत्रज्ञानाचे एक युगच भूतलावर अवतरले. सध्याचे एकविसावे शतक हे ज्ञानयुगाच्या प्रवेशाच्या नांदीचं शतक आहे. या शतकात इतर कोणत्याही स्रोतांच्या तुलनेत ज्ञानाचे महत्त्व अनन्यसाधारण असणार आहे. साहजिकच भारतासारख्या विकसनशील देशाला ही एक उत्तम संधी असेल विकासाकडे झेप घेण्याची. त्यासाठी देशाला ज्ञानसमृद्ध व्हावं लागेल आणि ज्ञानाच्या समर्पक उपयोगातून चांगल्या पद्धतीचं अर्थकारण साधण्यासाठी विविध पर्याय शोधून काढणं गरजेचं ठरेल. यासाठी भारतीय समाजाला अधिकच एकात्मिक व गतिमान व्हावे लागले. या समाजाचे स्वरूप ज्ञानाधिष्ठित असेल; जो समाज 'ज्ञान' या संकल्पनेभोवती केंद्रित झालेला असेल.

पीटर एफ. ड्रकर यांनी ज्ञानाधिष्ठित समाजाची संकल्पना मांडताना खालील वैशिष्ट्यपूर्ण मुद्दयांचा विचार केलेला आहे.

१. पैशापेक्षा ज्ञान विनासायास पसरते. त्याला सीमाक्षेत्रांचे बंधन नाही.
२. अगदी थोडं व जुजबी शिक्षण घेतलेल्या प्रत्येकाला ते उपलब्ध होऊ शकते आणि ज्ञानाचा प्रसार सर्व दिशांनी सहज होऊ शकतो.
३. ज्ञानामध्ये यशस्वी किंवा अयशस्वी होण्याची क्षमता आहे. कोणीही स्वतःच्या भाकरीला आवश्यक असणारे ज्ञान सहज प्राप्त करू शकतो. परंतु असं ज्ञान घेणारा प्रत्येकजण विजयी ठरेल असं मात्र नाही.

वरील मुद्द्यांचा विचार करता साहजिकच सर्व देश ज्ञानाधिष्ठित समाजामध्ये स्वतःच रूपांतर करण्याचा प्रयत्न करतील. ज्ञानाची ताकद समजून घेतील आणि ज्ञानाचा खुबीने उपयोग करून अर्थार्जन करतील. या समाजाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे असतील-

१. ज्ञानाधिष्ठित समाज हा त्याच्याकडे असलेल्या सर्व स्तरावरील ज्ञानाचा वापर करून आपल्या लोकांना सक्षम व संपन्न करण्याचा प्रयत्न करतो.
२. सामाजिक परिवर्तनासाठी तो ज्ञानाचा शक्तिशाली साधन म्हणून वापर करतो.
३. सतत शिकणारा समाज नवनिर्मितीसाठी वचनबद्ध असतो.
४. ज्ञाननिर्मिती, ज्ञानग्रहण, ज्ञानप्रसार आणि ज्ञानसुरक्षा करण्याची त्याची क्षमता असते. या व्यतिरिक्त, मिळवण्यासाठी आणि सर्वांना सामाजिक फायदे मिळवून देण्याच्या बाबतीतदेखील तो सक्षम असतो.

ज्ञानाधिष्ठित समाजाचे स्वरूप व त्याची वैशिष्ट्यपूर्णता पाहता या समाजासाठी व या समाजामध्ये असणारे शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व वेगळे सांगावे लागत नाही. कारण या ज्ञानाधिष्ठित समाजाचा आत्मा असणारी संकल्पना म्हणजे 'ज्ञान' होय व या ज्ञानाची निर्मिती करणारे प्रतिभावंत, ज्ञानवंत, तज्ज्ञ, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ यांची निर्मिती करणारे क्षेत्र हे शिक्षण होय.

भारतासारख्या प्रचंड मनुष्यबळ असणाऱ्या देशाला खऱ्या अर्थाने जगाचे नेतृत्व करण्याची शक्ती या ज्ञानाच्या जोरावर मिळू शकते. त्यासाठी या भारतीय समाजाला आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदलही करावे लागतील. ज्ञानाधिष्ठित समाजाकडे वाटचाल करण्यासाठी शिक्षण पद्धतीमध्ये केलेला बदल प्रत्यक्ष समाज ज्ञानाधिष्ठित झाल्यावर अजून वेगळा असेल. कारण या समाजातील दुसरे एक वैशिष्ट्य असेल सतत नावीन्य व नित्यनूतनता जी समाजाला सतत अध्ययनशील ठेवेल.

## ज्ञानाधिष्ठित समाजातील शिक्षणाची पद्धती :-

वर्तमानकाळात पूर्ण रूपाने अस्तित्वात नसलेला परंतु काहीशी चाहूल लागलेला व लवकरच मूर्त रूप धारण करू पाहणारा हा ज्ञानाधिष्ठित समाज आपली एक स्वतंत्र, वैशिष्ट्यपूर्ण अशी शिक्षण पद्धती घेऊन येणार आहे. जी शिक्षणाचे ध्येय, अभ्यासक्रम, अध्ययनाचे ठिकाण, अध्यापनाची पद्धती, शैक्षणिक साधने, मूल्यमापन पद्धती या सर्वच बाबतीत वर्तमान शिक्षण पद्धतीपेक्षा वेगळी असेल. या शिक्षण पद्धतीचे स्वरूप रेखाटताना भविष्याभ्यासाचा आधार घ्यावा लागेल. त्याआधारे या शिक्षण पद्धतीचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

मागील ज्ञानाधिष्ठित शिक्षण पद्धतीचे स्वरूप लक्षात घेता बदललेली शिक्षणाची ध्येये, त्यासंदर्भात बदललेला अभ्यासक्रम लक्षात घेता अध्यापन प्रक्रियेमध्ये बदल झालेला दिसेल. या शिक्षण पद्धतीमध्ये केले जाणारे अध्यापन हे विद्यार्थ्याला त्याच्या अध्ययनातून ज्ञानासाठी आवश्यक तंत्र, कौशल्ये, क्षमता यांचा विकास करणारे असेल.

## ज्ञानाधिष्ठित समाजातील शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये :-

ज्ञानाधिष्ठित समाजामध्ये शिक्षण पद्धतीमध्ये जे बदल घडून येतील व परिणामतः त्या शिक्षण पद्धतीचे काही ठळक वैशिष्ट्ये दिसू लागतील त्याबद्दल खालीलप्रमाणे चर्चा करता येईल.

१. लवचीक अभ्यासक्रम असणारी ही पद्धती, आशयाच्या बाबतीत केवळ पाठ्यपुस्तककेंद्री राहणार नाही. यात संगणक, इंटरनेट, सी. डी., बहुमाध्यमसंच, प्रत्यक्ष अनुभव यावर भर असेल.

२. प्रचलित शिक्षण पद्धतीमध्ये ज्याप्रमाणे भूतकालीन घटनांचा तार्किक व विश्लेषणात्मक अभ्यासासाठी इतिहास शिकवला जातो. त्याप्रमाणेच ज्ञानाधिष्ठित, गतिमान व अध्ययनशील समाजात भविष्याचा वेध घेणारे भविष्याभ्यास हा एक अविभाज्य विषय असेल.

३. गतिमान समाजामध्ये शिक्षण पद्धतीही गतिमानच असेल, मोबाईल एज्युकेशन, मोबाईल क्लासरूम असे चित्र दिसेल.

४. ज्ञानाधिष्ठित समाजातील शिक्षणाचा एक अविभाज्य भाग जो तंत्रज्ञान आहे त्याच्या प्रभावामुळे शिक्षण पद्धतीचा काही भाग, स्तर हा घरी बसून शिक्षण घेण्याची, परीक्षा देण्याची सोय असलेला असेल, मूल्यशिक्षण, समग्र जीवनासाठी शिक्षण वा जीवनव्यापी शिक्षण या शैक्षणिक विचारप्रवाहाची दखल शिक्षणाच्या सर्व स्तरावर घेतलेली असेल.

६. विद्यार्थ्याला ज्ञानासाठी ज्ञान देणे एवढाच हेतू असणार नाही तर या ज्ञानाचा प्रत्यक्ष वापर कसा करावा यासाठी शिक्षण दिले जाईल.

७. विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी आवश्यक सूत्रे, तत्त्वे, पद्धती, कौशल्य, क्षमता यांचा विकास करणे हाच अध्यापनाचा हेतू असेल.

८. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी सतत मूल्यमापन व सर्वकष मूल्यमापनाचा दृष्टिकोण पुढे ठेवला जाईल.

९. ज्ञानाधिष्ठित समाजातील शिक्षणाचा आत्मा जरी ज्ञान असला तरी विद्यार्थ्यांचा केवळ बोधात्मक विकास हाच या शिक्षण पद्धतीचा उद्देश असणार नाही. विद्यार्थ्यांच्या भावात्मक व क्रियात्मक विकासाकडेही आवश्यक ते लक्ष केंद्रित केले जाईल.

१०. शिक्षणक्षेत्रामध्ये ज्ञाननिर्मिती, ज्ञानाची पुनर्बांधणी वा पुनर्रचना यासंदर्भात संशोधने हाती घेऊन प्रत्येक विद्यार्थी ज्ञानात्मकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

११. ज्ञानाच्या बिनचूक वापरामधून राष्ट्राच्या आर्थिक विकासात भरीव वृद्धी करण्यासाठी ज्ञानपूरक व्यावसायिक शिक्षण या पद्धतीमध्ये दिले जाईल.

१२. ज्ञानाचे व्यवस्थापन व ज्ञानाचे संरक्षण या दृष्टीनेही आवश्यक ते शिक्षण या पद्धतीमध्ये असेल.

## समारोप :-

प्रस्तुत ज्ञानाधिष्ठित समाजाची वैशिष्ट्ये लक्षात घेता असे दिसते की, या समाजाच्या प्रगतीमध्ये ज्ञानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या ज्ञानात्मक विविध प्रक्रियेमधूनच नोकरीच्या, रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतील. प्रत्येक व्यक्ती

बौद्धिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व स्वतंत्र असेल. यासाठी आवश्यक क्षमता भारतीय समाजाने आत्मसात करण्याकडे लक्ष केंद्रित करावे. कारण ज्या समाजाकडे ज्ञाननिर्मितीची, ते ग्रहण करण्याची, आत्मसात करण्याची, त्याचे संरक्षण करण्याची आणि वापरण्याची सुयोग्य क्षमता असते तोच समाज जगाचे नेतृत्व करेल.